क्रमांक:- पोअवा/पोकनि/उच्चशिक्षण-प्रो.यो/ 9091 /२०१६ वाशिम दिनांक 21 OCT 2016

संदर्भ:- मा.पोलीस महासंचालक,म.रा.मुबंई यांचे पत्र क्र.पोमसं/२८-अे/४९३७/उच्चशिक्षण.प्रो.यो
१३९/२०१६ दि.१९.९.२०१६

विषय:- पोलीस कल्याण निधी सदस्यांच्या मुलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन योजना.

-oo-

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये कळविण्यात येते की,ज्या पोलीस अधीकारी तसेच कर्मचारी यांचे ( पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक पर्यंत) तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे पाल्यांना खालील नमुद शिक्षण संस्थामध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांस एकावेळी रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये ) इतकी रक्कम अनुदान/स्कॉलरशिप म्हणुन पोलीस कल्याण निधी मधुन देण्यात येईल.

१.भारतीय अभियंत्रिकी संस्था (IIT)

२.महाराष्ट्रातील किंवा देशांतर्गत कोणतेही वैद्यकीय महाविद्यालय जेथे अखिल भारतीय स्तारावर किंवा महाराष्ट्र राज्याच्या सी.ई.टी मार्फत प्रवेश देण्यात येतो.

३.भारतीय प्रबंध संस्था (IIM)

४.सर्व नॅशनल लॉ स्कूलस

५.सर्व राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था (NIT)

६.डेंटल कॉलेज,जेथे अखिल भारतीय स्तरावर किंवा महाराष्ट्र राज्याच्या सी.ई.टी.मार्फत प्रवेश देण्यात येतो.

वरील शिक्षण संस्थांसह बी.टेक/बी.ए.एम.एस/बी.एच.एम.एस/इतर मॅनेजमेंट कॉलेज,बी.सी.ए/एम.सी.ए अशा प्रकारचे व त्या सकमक्ष इतर महत्वाचे शिक्षण घेत असलेल्या शासनमान्य अभियंत्रिकी/वैद्यकीय तसेच प्रबंध संस्थामध्ये आणि इतर शासनमान्य व्यावसाईक अभ्यासक्रमासाठी पाल्यांच्या शिक्षणासाठी अधिकारी/कर्मचा-यांना कर्ज स्वरुपात शिक्षणासाठी वार्षिक टयुशन फी स्वरुपात भराव्या लागणा-या फी एवढी रक्कम रु.५०,०००/-(रुपये पन्नास हजार)च्या वार्षीक कमाल मर्यादेत १२ मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करण्याच्या अटीवर देण्यात येईल.कर्जस्वरुपात घेतलेल्या रकमेची परतफेड केल्यानंतर संबधीत पाल्याने त्या कोर्समध्ये गुणवत्ता प्राप्त केल्यास (शैक्षणिक सत्रात ६०% पेक्षा जास्त गुण मिळविल्यास व पाल्यांना आवश्यकता भासल्यास) परत रुपये ५०,०००/- शैक्षणिक कर्ज म्हणुन (त्याच अटीवर) देण्यास पात्र राहतील.हे अग्रीम ज्या पाल्यांना रु.२५,०००/- अनुदान/स्कॉलरशिप देण्यात आली आहे त्यांनाही देय राहील.

वरील पैकी कोणत्याही शिक्षण संस्थेमध्ये देणगी(Donation)देवुन प्रवेश घेतलेल्या पाल्यांना सदरची योजना लागू होणार नाही.

तरी पोलीस अधिकारी/ कर्मचा-यांनी ( पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक पर्यंत) तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांनी नमुद शिक्षण संस्थामध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांची माहिती खालील विवरण पत्रात भरुन व त्या संबधात असलेले कागदपत्र १० दिवसाचे आत प्रभारी पोलीस अधिकारी यांचे मार्फत या कार्यालयास सादर करावी.

| अ.क्र | पाल्यांचे नाव | शिक्षण घेतअसलेल्या संस्थचे/कॉलेजचे नांव | शिक्षणाचा स्तर/वर्ष | वार्षिक फि रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

( प्रशांत होळकर)
पोलीस अधीक्षक,वाशिम

प्रति,

उपविभागीय पोलीस अधीकारी,वाशिम/मंगरुळपीर/कारंजा/ठाणेदार पोलीस स्टेशन ,वाशिम शहर /वाशिमग्रामीण/मालेगांवशिरपुर/रिसोड/अनसिंग/आसेगांव/जऊळका/मंगरुळपीर/कारंजाशहर/कारंजा ग्रामीण/मानोरा/धनज/पोनि.स्थागुशा/मतनी/जिवीशा/शवाशा/जिवाशा/वाचकशाखा/नियंत्रणकक्ष/कल्याण शाखा/अमानी/बिनंतारी संदेश विभाग/दहशतावाद विरोधी पथक/पोउपनि मोपवि/बॉम्ब शोधक पथक/क्ष्वान पथक/रापोनि.पो.मु.वाशिम.

२/- सदरचे परिपत्रक सकाळ/संध्याकाळचे गणनेचे वेळेत सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन देवुन तशी नोंद स्टे.डायरी मध्ये घेवुन सदरचे परिपत्रक नोटीस बोर्डावर सर्वाकरिता लावण्यात यावे.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना:-

पोलीस उपअधिक्षक (मुख्या),वाशिम/कार्यालय अधीक्षक/प्रमुख लिपीक आस्थापनाशाखा/पत्रव्यवाहर शाखा/लेखा शाखा/डिपीजी लिपीक/संगणक कक्ष पोलीस अधीक्षक,कार्यालय वाशिम

२/- कार्यालय अधीक्षक व प्रमुख लिपीक यांनी सदरची बाब ही सर्व लीपीक वर्गीय कर्मचा-यांचे निदर्शनास आणून दयावी.

२/- संगणक कक्ष यांनी सदरचे परिपत्रक पोलीस अधीक्षक,वाशिम यांचे संकेतस्थळावर सर्वा करिता त्वरीत उपलब्ध करुन दयावे.